दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३०६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.३१ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## दोन वेगवेगळ्या अपघातात २ ठार १ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोन ठार, एक जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पनवेल जवळील वडघर फाटा येथून एमपीएससी कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका पादचाऱ्याला अज्ञात वाहनाची धडक बसून त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यु झाला आहे. या घटनेतील मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा तसेच अज्ञात अपघात करणाऱ्या वाहनाचा शोध पनवेल शहर पोलिस करीत आहेत.

तर दुसऱ्या घटनेत सीबीडी येथून मोटारसायकलवरून मुंबई बाजूकडे जात असताना तेजस बर्गे व प्रदिप माने यांच्या गाडीवरील नियंत्रण सुटल्याने त्यांनी रस्त्याच्या दुभाजकाला धडक देऊन झालेल्या अपघातात ते दोघे गंभीररित्या जखमी झाले. यात प्रदिप माने याचा दुर्दैवी मृत्यु झाला आहे. या अपघाताची नोंद सीबीडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पेण : वाशी सरेभाग परिसरातील युवतीवर गँगरेप ; ७ आरोपी गजाआड ३ जण फरार

## आरोपींना वाचण्यासाठी स्वयंघोषित नेत्यांची धडपड

**दै.रायगड नगरी । पेण**

**पेण तालुक्यातील वाशी सरेभाग परिसरातील एका १७ वर्षीय युवतीला सतत धमकी देऊन ब्लॅकमेल करत काही युवकांनी गँगरेप केल्याची संतापजनक घटना उघडकीस आल्याने पेण तालुक्यामध्ये एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात युवतीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या ७ आरोपीना पोलिसांनी तात्काळ गजाआड केले आहे. तर ३ आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या बाबत वडखळ पोलिस ठाण्यात पोस्को अंतर्गत रजिस्टर नंबर १५/२०२२, ३७६ (ड) पोस्को कलम ३७६ ,४, ८, ७, १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या ७ आरोपींना न्यायालयाने ६ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.**




याबाबत सविस्तर हकीकत अशी की, पेण तालुक्यातील वाशी सरेभाग येथे राहणारी दहावीपर्यंत शिकलेली १७ वर्षीय युवती शेजारीच असलेल्या वाशी गावाच्या परिसरात एका हळदी समारंभासाठी गेली होती. सदर ठिकाणी रात्री या युवतीची ओळख २ तरुणांसोबत झाली होती. या ओळखीचे रुपांतर काहीच दिवसात प्रेमात झाले. त्यातून त्या तरुणांनी तिचा गैरफायदा घेत तिच्यावर शारिरिक अत्याचार केले. त्यानंतर त्यांच्या मित्रांना याबाबतची माहिती व मोबाईल नंबर मिळताच त्यांनीही धमकावत त्या तरुणीवर अत्याचार केला. सदर नराधम या युवतीला धमकी देत दररोज आळीपाळीने तिच्यावर बलात्कार करीत होते. मागील अनेक महिन्यांपासून नराधमांनी तिचे लैंगिक शोषण केले. या प्रकरणात अजून सुमारे १५ ते २० हून अधिक नराधम या कृत्यात सहभागी असल्याची स्थानिकांत चर्चा सुरू आहे.

पीडित युवतीला हे नराधम लैंगिक शोषणा करिता वारंवार फोन करीत होते. आपल्या मुलीला वारंवार फोन येत असल्याने पीडित युवतीच्या पालकांनी तिला विश्वासात घेऊन विचारपूस केल्यानंतर पीडित युवतीने गँगरेपची व ब्लॅकमेलचे धक्कादायक वास्तव उघड केले. पीडित युवतीवर गँगरेप झाल्याची चर्चा वाशी पंचक्रोशीत पसरल्यानंतर अनेक पक्षांच्या स्वयंघोषित नेत्यांनी आपल्या नराधम नातेवाईकाला व परिचिताला वाचवण्याकरिता धडपड सुरू केल्याची चर्चा ग्रामस्थ करीत आहेत. पीडित युवतीचे कुटुंबीय अतिशय गरीब असल्याने त्यांना मॅनेज करण्याचा खटाटोप सुरू असल्याचा आरोपही ग्रामस्थ करीत आहेत.

या गँगरेप प्रकरणाचा तपास पारदर्शक पद्धतीने तपास होण्याकरिता जिल्हा पोलिस अधीक्षकांनी सोनाली कदम या अलिबाग येथील उपविभागीय पोलिस अधिकारी यांची तपास अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. फरार आरोपींच्या शोधाकरिता पोलिसांनी एक पथक तयार केले आहे. १७ वर्षीय मुलीवर गँगरेप करणाऱ्या पोलिसांच्या ताब्यात असलेल्या नराधम सात आरोपींची व फरार आरोपींची नावे पत्रकारांना देण्यास पोलीस अधिकारी टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे या प्रकरणात खरोखर राजकीय दबाव आहे का? याची शंका व्यक्त केली जात आहे.

## पेण पोलिसांच्या कस्टडी मधील आरोपी पळाला

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण येथील एसबीआय बँकेच्या एटीएम मशीन वर दरोडा टाकून ५६ लाख ३४ हजार ८०० रुपये रोकड घेऊन पळून गेलेल्या दरोडेखोरांनी पेण पोलिसांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगलेली असतानाच आज रविवारी सकाळी पुन्हा पेण पोलिसांच्या जेल मधील आरोपीने पलायन केल्याने पेण पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.


या बाबत सविस्तर वृत्त असे कि, वडखळ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पाबळ जवळील कार्ली गावात झारखंड येथील पोकलन ऑपरेटर राजेंद्र यादव ( वय ४२, रा.झारखंड) याच्यावर त्याचा सहाय्यक असलेला बिरु गणेश महातो (वय १९, रा.झारखंड) याने किरकोळ कारणावरून धारदार कोयत्याने वार करुन त्यास गंभीर जखमी करण्याची घटना २८ जानेवारीला घडली होती. या प्रकरणी वडखळ पोलिसांनी गुन्हा रजिस्टर क्र.१६ / २०२२ भा द वि कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपी बिरु महातो याला अटक केली होती. या आरोपीला पेण पोलीस ठाण्याच्या पोलीस कस्टडी मध्ये ठेवण्यात आले होते. आज रविवारी या आरोपीला प्रातविधी साठी सकाळी बाहेर काढण्यात आले होते. मात्र आरोपी बिरु महातो याने शौचालया च्या बाजूस असलेल्या भिंतीवरून उडी मारुन मागील बाजूने प्रभू आळी बाजूला पळाला असल्याची माहिती मिळत आहे.

कास्टडीतील आरोपी पळाल्याची माहिती मिळताच पेण पोलिसांची एकच धावपळ उडाली. या आरोपीच्या शोधात जवळपास अख्खे पोलीस स्टेशन पेण शहर, मुंबई – गोवा महामार्ग, पेण खोपोली रोड, रेल्वे स्टेशन, बस स्टँड परिसरात शोध घेत होते. या आरोपीच्या तपासा साठी गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस देखील पेणचा परिसर पिंजून काढत होते. मात्र सायंकाळ उशिरा पर्यंत हा आरोपी पोलिसांना सापडून आला नव्हता.

## मुंबई-पुणे महामार्गावर भीषण अपघात; पाच जणांचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । पुणे**

जुन्या मुंबई–पुणे महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. भरधाव कार आणि कंटेनरमध्ये धडक झाली आहे. हा अपघात इतका भीषण होता की, अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या कारला हा अपघात झाला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, जुन्या मुंबई–पुणे महामार्गावर सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला आहे. कार मुंबईहून पुण्याच्या दिशेने निघाली होती.



कार चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी दुभाजक ओलांडून थेट पलिकडच्या मार्गावर गेली. त्यानंतर समोरुन येणाऱ्या कंटेनरला जोरदार धडक दिली असल्याची माहिती समोर आली आहे. अपघात झालेली ही गाडी हरियाणा पासिंगची असल्याची माहिती समोर आली आहे. अपघातात गाडीतील मासीदेवी तिलोक (८२), .../२

## तळोज्यात पेट्रोलजन्य ज्वलनशिल द्रव्य पदार्थ जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुजरात वापी येथून सीबीडी बेलापूर परिसरात जाणारा पेट्रोलजन्य ज्वलनशिल द्रव्य पदार्थ भरलेला टाटा कंपनीचा टँकर तळोजा हद्दीत एका रिकाम्या जागेत पार्किंग करून या पेट्रोलजन्य ज्वलनशिल द्रव्य भेसळयुक्त करताना तळोजा पोलिसांनी व पनवेल तहसील कार्यालयाच्या पथक असे सयुक्तिक कारवाई करून मुद्देमाल जप्त करण्यात आला असून टँकर चालकाला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र हा पेट्रोलजन्य ज्वलनशिल द्रव्य पदार्थ बायोडिझेल असण्याची शक्यता असल्याने नमुने तापासणीसाठी पाठविण्यात आले आहे. याबाबत अधिक तपास तळोजा पोलीस करीत आहेत.

पेट्रोल–डिझेलची विक्री हा अत्यंत संवेदनशील विषय असल्यामुळे त्याचे नियंत्रण थेट केंद्र सरकारकडे असते. त्यासाठी सरकारने पेट्रोलियम अधिनियम १९३४ हा स्वतंत्र कायदा केला असून, त्याची अत्यंत काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते. पेट्रोल–डिझेल भारतात आणण्यापासून त्याची डेपोपर्यंतची वाहतूक आणि डेपोमधून निर्धारित पेट्रोलपंपांवर होणारी वाहतूक व विक्री या सर्व प्रक्रियेवर केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाचे नियंत्रण असते. साठवणूक ते वितरण या संपूर्ण प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणारे पेट्रोलियम तथा विस्फोटक सुरक्षा नियंत्रण संघटन (पेसो) हे नियामक मंडळ असते. अत्यंत विस्फोटक पदार्थ असल्यामुळे त्यांच्या वाहतूक–विक्री प्रक्रियेतील किरकोळ चूकही अत्यंत घातक ठरू शकते.

पेट्रोलियम पदार्थांचा साठा करण्यावरही मर्यादा आहेत. गुजरात वापी येथून टाटा कंपनीचा टँकर क्रमांक जी.जे २१ वाय ९१७१ या टँकरमध्ये पेट्रोलजन्य ज्वलनशिल द्रव्य पदार्थ घेऊन सीबीडी बेलापूर परिसरात जायचे होते. मात्र या टँकरचालकाने तळोजा हद्दीतील एका कंपनीजवळील मैदानावर वाहन उभे करून या ज्वलनशिल द्रव्य पदार्थामध्ये भेसळ करीत असताना तळोजा पोलीस व पनवेल तहसील कार्यालयाच्या पथकाने उत्तरप्रदेश येथे राहणार टँकरचाल संसारीराम राजाराम यादव याला पथकाने ताब्यात घेतले.

त्याचबरोबर तळोजा पोलीस ठाण्यात पेट्रोलियम अधिनियम १९३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र हा ज्वलनशिल द्रव्य हा बायोडिझेल आहे कि आणखी काय याबाबत याचा नमुना मुंबई कालिना येथे तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे. तपासणीचा अहवाल आल्यानंतरच हा कोणता द्रव्य आहे याची माहिती मिळणार आहे. याबाबत अधिक तपास तळोजा पोलीस करीत आहेत.

## संक्षिप्त...

### राज्यात आणखी दोन दिवस कडाक्याची थंडी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पुढील ४८ तासांमध्ये उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट कायम राहणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान केंद्राने व्यक्त केला आहे. तसेच फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पाऊस पडणार असल्याचाही अंदाज हवामान केंद्राने व्यक्त केला आहे.

मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, उत्तर महाराष्ट्रातील नंदूरबार, धुळे, नाशिक, जळगाव आणि औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली आणि नांदेडमध्ये थंडीची लाट कायम राहणार आहे. मात्र, फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासून राज्यातील थंडीचा जोर कमी होईल, असा अंदाज हवामान केंद्राने वर्तवला आहे. दरम्यान मुंबईत आज रविवारी कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस, कर किमान तापमान १८ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले आहे. तसेच पुण्यात कमाल तापमान २८ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १२ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले.

## माथेरानचा पारदर्शक कारभार हीच खऱ्या अर्थाने पर्यटन क्रांती : महेंद्र घरत



**दै.रायगड नगरी । माथेरान**

निसर्गाने माथेरान या स्थळाला अगदी भरभरून नैसर्गिकरित्या सौंदर्य बहाल केले आहे. स्वच्छ हवा, गर्द झाडी आणि चोहोबाजूंनी वेढलेला डोंगर हे खासकरून माथेरानचे सौभाग्याचे लेणे म्हणावे लागेल. अशा या नयनरम्य ठिकाणी पर्यटन कशाप्रकारे वाढेल, यातूनच इथल्या सर्वसामान्य लोकांना,कष्टकरी लोकांना रोजगाराच्या संधी कशाप्रकारे अधिकाधिक निर्माण होऊ शकतात यासाठी प्रयत्न न करता केवळ एक दिखावा म्हणून कामे केली गेली आहेत असे अनेकवेळा ऐकावयास मिळाले होते. त्यामुळे आगामी काळात माथेरान हे भ्रष्टाचार मुक्त होण्यासाठी,संपूर्ण पारदर्शक कारभार होण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना पुढाकार घ्यावा लागेल तेव्हाच इथे खऱ्या अर्थाने पर्यटन क्रांती दिसून येईल. असे प्रतिपादन रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष महेंद्र घरत यांनी केले.

माथेरान मधील हॉटेल राधा कॉटेज याठिकाणी काँग्रेस कार्यकर्त्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती त्यावेळेस महेंद्र घरत बोलत होते. ते पुढे म्हणाले की राज्य पातळीवर पक्षाचे निवडणूक बाबतीत जे काही निर्णय होतात ते त्याठिकाणी योग्य असतात त्यामुळे माथेरान मधील निवडणूक काळात काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी समविचारी पक्ष जर का सोबत आले तर त्यांच्या सोबत नक्कीच येथील स्थानिक पा–तळीवर युती ,आघाडी करून भ्रष्टाचार मुक्तीसाठी सत्तांतर घडवून आणणे ही खरोखरच काळाची गरज आहे असेही महेंद्र घरत यांनी आवर्जून नमूद केले.कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव माथेरान काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा मनोज खेडकर यांची नियुक्ती करण्यात आली तर उपाध्यक्ष पदावर शुभम गायकवाड या होतकरू कार्यकर्त्याला संधी देण्यात आली त्यांचे घरत यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, महिला आघाडी अध्यक्षा वर्षा बिरामणे,युवक काँग्रेस अध्यक्ष आदित्य भिल्लारे,पतसंस्था सभापती हेमंत पवार, केतन रामाणे, विठ्ठल पवार,माजी नगरसेवक संतोष लखन, सुनील शिंदे, राकेश कोकळे,भास्कर शिंदे,मनोज रेनोसे यांसह अन्य महिला कार्यकर्त्या सुध्दा मोठया संख्येने उपस्थित होत्या.

काँग्रेसचे शहर अध्यक्ष मनोज खेडकर यांनी सांगितले की, माथेरान करांचे चार दशकांपासून असलेले कर्जत ते माथेरान दरम्यान मिनीबसचे स्वप्न .../२

## नागोठण्याला पुन्हा एकदा बालेकिल्ला बनविण्यासाठी तरुणांनो कामाला लागा : खा. सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

**दत्ताजीराव तटकरे साहेबांच्या राजकारणाला १९७० च्या आसपास गती मिळाली त्यावेळी काही मोजकेच सहकारी त्यांच्यासोबत होते. तात्यासाहेब टकेंचे नाव त्यामध्ये अग्रणी होते. त्यानंतर परिवर्तनाची ताकद सुरु झाली. या ताकदीचा प्रभाव रोहा तालुक्यात त्यावेळच्या काँग्रेस पक्षामध्ये तटकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली आला त्याचे जनक हे वांगणीतील म.ता. ठाकूर साहेब होते. आज नागोठणे विभागात तरुण फळीच्या माध्यमातून पक्षाची घौडदौड सुरु आहे. वांगणीतील असंख्य कार्यकर्त्यांचा आज राष्ट्रवादीत प्रवेश हे त्याचेच फलित आहे. त्यामुळे मधला एक अपवाद वगळता नागोठणे हा यापूर्वीही राष्ट्रवादीचा बालेकिल्ला होता व आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत नागोठणेला पुन्हा एकदा बालेकिल्ला बनविण्यासाठी तरुणांनो कामाला लागा, माझी संपूर्ण ताकद तुमच्या मागे आहे असे वक्तव्य खासदार सुनील तटकरे यांनी केले.**

नागोठण्याजवळील वांगणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व नवनिर्वाचित सदस्य एकनाथ ठाकूर यांच्यासह येथील वारकरी संप्रदायातील एक प्रमुक व्यक्तिमत्व ह.भ.प. दळवी गुरुजी, प्रियदर्शनी चालक–मालक संस्थेचे संचालक शेखर ठाकूर, शंकर ठाकूर, भारतीय कामगार महासंघ कर्मचारी संघटनेचे सुप्रीम पेट्रोकेम कंपनी युनिट मधील उपाध्यक्ष कांचन ठाकूर आदींसह वांगणीतील सुमारे ६५ कार्यकर्त्यांनी तरुणांचे स्फूर्तीस्थान आमदार अनिकेतभाई तटकरे व ना. आदितीताई तटकरे यांच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला त्यावेळी खा. तटकरे बोलत होते.

सुतारवाडी येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात रविवारी (दि.३०) संपन्न झालेल्या या पक्ष प्रवेश सोहळ्यास जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. आदितीताई तटकरे, आमदार अनिकेतभाई तटकरे, राष्ट्रवादीचे नागोठणे विभागीय नेते भाई टके, मधुकर ठमके, चंद्रकांत जांबेकर, माणगाव–महाड विधानसभा रा.कॉ. अध्यक्ष बाबुशेठ खानविलकर, युवती जिल्हाध्यक्ष सायली दळवी, विभागीय अध्यक्ष संतोषभाई कोळी, कृष्णा धामणे, .../२



# 'महाराजा'चा नवा प्रवास

कर्जात बुडालेल्या, जुन्या विमानांनी खंगलेल्या, वेळापत्रकाचा बोजवारा उडालेल्या, नाराज कर्मचाऱ्यांनी त्रासलेल्या आणि 'बडा घर, पोकळ वासा' बनलेल्या 'एअर इंडिया' या भारताच्या राष्ट्रीय विमान कंपनीचा नवा प्रवास सुरू झाला आहे. टाटा समूहाच्या खासगी विमान कंपनीचे स्वातंत्र्यानंतर भलत्याच समाजवादी संकल्पनांच्या आहारी जाऊन राष्ट्रीयीकरण करण्यात आले होते. त्याच टाटा समूहाने ही कर्जजर्जर कंपनी ताब्यात घेऊन, आता तिला नवे रंगरूप देण्याचे ठरविले आहे. ही हस्तांतराची प्रक्रिया चालू होती. ती आता पुरी झाली आहे. नवे मोठे निर्णय यायला थोडा वेळ लागेल; मात्र टाटांच्या काही निर्णयांचे सूतोवाच होऊ लागले आहे. त्यात वेळापत्रक तंतोतंत पाळणे, परिचारकांचे नवे वेष, नवी अंतर्गत सजावट, नवीन खाद्यसेवा अशा बाबी आहेत. या महत्त्वाच्या असल्या, तरी काहीशा कमी खर्चाच्या आणि टाटांच्या उद्योग संस्कृतीशी सुसंगत आहेत. 'एअर इंडिया' टाटांकडे आली, तेव्हा रतन टाटांनी स्वागताचे ट्वीट करताना दोन मुद्दे मांडले होते. पहिला म्हणजे, 'एअर इंडिया' जेआरडी टाटांच्या नेतृत्वाखाली चालत होती, तेव्हा तिची गणना जगातल्या अत्यंत नामांकित आणि प्रतिष्ठित हवाईसेवा कंपन्यांमध्ये होत असे. दुसरे म्हणजे, आज जेआरडी असते, तर 'एअर इंडिया' पुन्हा टाटांकडे आल्याचा त्यांना मनस्वी आनंद झाला असता. याचा अर्थ, टाटांनी 'एअर इंडिया'सारख्या बुडत्या जहाजात इतका जीव आणि पैसा गुंतविणे, हा केवळ आर्थिक निर्णय नाही. त्यात बरीच भावनिक गुंतवणूक आहे. इतक्या मोठ्या आर्थिक निर्णयांमागे भावना असतात का, असा प्रश्न कुणालाही पडेल; मात्र उद्योग विश्वातही अनेकदा असे निर्णय होत असतात. या निर्णयांची खरी परीक्षा पुढे असते. रतन टाटांच्या ट्वीटच्या पहिल्या मुद्द्यातच या परीक्षेचे सूचन आहे. जेआरडी टाटा यांच्या नेतृत्वाखाली 'एअर इंडिया' जशी होती, तशी ती पुन्हा बनवायची, हे शिवधनुष्य सोपे नाही. एक तर, तांत्रिक प्रगतीपासून आर्थिक गणितापर्यंत सारे बदलले आहे. जगातल्या अगदी छोट्या देशांच्या विमान कंपन्या सेवा, वेळापत्रक, तिकिटांचे दर आणि वेग यांबाबत 'एअर इंडिया'च्या किती तरी पुढे आहेत. हे अंतर कापून काढणे सोपे नाही आणि ते दोन-चार महिन्यांत होणारही नाही. त्यासाठी, 'एअर इंडिया'चे केवळ रूपरंग नव्हे, तर सारी कार्यसंस्कृतीच पुरती पालटून टाकावी लागणार आहे. याहीपेक्षा मोठा मुद्दा आहे, तो आताचा ताफा बदलून तरणाबांड व तरतरीत नवा विमानताफा बांधण्याचा. येथे प्रश्न पैशाचा आहे. टाटा कंपनी कितीही गंगाजळी राखून असली, तरी 'एअर इंडिया'च्या नूतनीकरणासाठी कित्येक हजार कोटी रुपये ओतावे लागतील. त्यासाठी आता 'एअर इंडिया'ला कर्ज देण्यासाठी स्टेट बँकेच्या नेतृत्वाखाली चार बँकांचा विशेष चमू बनविण्यात आला आहे. आज 'एअर इंडिया'च्या डोक्यावर १५ हजार कोटींचे कर्ज आहे. ते निपटून, नंतर टप्प्याटप्प्यांमध्ये आणखी १५ ते २० हजार कोटी रुपये गुंतवावे लागतील. केवळ नव्या विमानताफ्यासाठीच नव्हे, तर खेळत्या भांडवलासाठीही कर्ज घ्यावे लागेल. हे सगळे होऊन, प्रवाशांना नव्या 'एअर इंडिया'चा सर्वंकष सुखद अनुभव यायला कित्येक महिने लागू शकतात. सगळी विमाने सुसज्ज आणि जुन्यांच्या जागी नवी असे व्हायला तर काही वर्षे जाऊ शकतात. भारतात उदारीकरणाचे पर्व सुरू झाल्याला तीस वर्षे उलटून गेली. ते सुरू झाले, तेव्हाच 'एअर इंडिया' सरकारने का चालवायची आणि ती खासगी क्षेत्राला का द्यायची नाही, याची गंभीर चर्चा सुरू झाली होती. या अंतहीन चर्चेत आणि 'एअर इंडिया'ला नवे रूप देण्याच्या नादात हजारो कोटींचे कर्ज तेवढे वाढले. सरकारने काय करायचे आणि काय टाळायचे, याचा 'एअर इंडिया' इतका दुसरा उत्तम धडा नसेल. तो शिकण्यासाठी करदात्या नागरिकांच्या डोक्यावर हजारो कोटींचे कर्ज बसले. या काळात जो प्रचंड भ्रष्टाचार अगदी वरच्या पातळीवरही झाला असेल, त्याचा तर काही हिशेबच नाही. गेल्या तीन दशकांत निर्गुंतवणुकीचे प्रस्ताव आले. प्रयत्नही झाले; मात्र ते दर वेळी हाणून पाडण्यात आले. या केंद्र सरकारने हा मुद्दा उगाचच प्रतिष्ठेचा न करता, 'एअर इंडिया' टाटांकडे सोपविली, हे अतिशय योग्य पाऊल म्हणावे लागेल. आता पुढची परीक्षा टाटांची आहे. ती ते देतील. त्यासाठी आवश्यक तो अनुभव, चपळ निर्णयप्रक्रिया आणि उत्तम व्यवस्थापक टाटांकडे आहेत. केंद्र किंवा राज्य सरकारांनी उद्योग-धंदे चालविण्याच्या भानगडीत न पडता, मर्यादित साधनांनिशी नागरिकांच्या आरोग्य, शिक्षणादि मूलभूत गरजांकडे लक्ष केंद्रित करावे, हे शिकायला इतकी दशके जावे लागली. आता 'महाराजा'चा पुढचा प्रवास तरी निदान भ्रष्टाचारमुक्त आणि लाल फितीत न अडकता व्हावा.

# जांभूळपाडा अंबा नदीवरील जुना पूल तोडण्यास सुरुवात

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

वाकण पाली खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. शनिवारी (ता.२९) या मार्गावरील जांभूळपाडा अंबा नदीवरील जुना पूल तोडण्यास सुरुवात झाली आहे. यावेळी उपस्थित ग्रामस्थांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरारले तर काहीजण गहिवरले देखील. १९८९ च्या महाभयंकर पुरामध्ये देखील हा पूल खंबीर उभा राहिला होता.



गेली ६७ वर्षे पाली खोपोली या शहरांना व असंख्य गाव आणि लोकांना जोडणारा हा पूल तुटत आहे हे पाहून अनेकजण गहिवरले तर नवीन पुलामुळे वाहतूक सुरळीत होऊन पावसाळ्यात पुलावरून पाणी जाऊन होणारी गैरसोय आता संपणार आहे हे पाहून अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरारले. ग्रामस्थांनी या पुलाशी निगडित त्यांच्या आठवणी यावेळी सांगितल्या.

विलास गलबले म्हणाले की गणपती विसर्जनावेळी या पुलावरून नदीत उड्या मारून पहायचो. आता याजागी उंच मोठे पूल होत असल्याने तसे करणे शक्य नाही. तर वैभव शिंदे यांनी सांगितले की या पुलाने ६७ वर्षे आम्हाला अविरत सेवा दिली. दरवर्षी पावसाळ्यात या पुलावरून पाणी जायचे आणि दोन्ही बाजूला वाहनांच्या लांब रांगा लागायच्या लहानपणी या रांगा बघायला आम्हाला मज्जा यायची. त्याबरोबर आम्हाला शाळेला सुट्टी दिली जायची तो आंनद वेगळाच होता. आता इथे नवीन पूल झाल्याने वाहनांच्या रांगा लागणार नाहीत आणि शाळेला देखील सुट्टी मिळणार नाही. ही बाब चांगली आहे. मात्र त्यामुळे विद्यार्थ्यांना गंमत येणार नाही. असे शिंदे म्हणाले. चिंदू बामगुडे, जेष्ठ नागरिकांनी सांगितले की साधारण १९५५ साली या व पालीच्या पुलांचे बांधकाम झाले.

त्यावेळी सुधागड तालुका भोर संस्थानात होता. त्यावेळी औंध संस्थानचे त्यावेळचे भोर संस्थानचे अखेरचे पंत श्रीमंत बाबासाहेब यांनी लोकमत प्रमाण मानून भोर संस्थान खालसा करण्यात येवून ८ मार्च १९४८ रोजी स्वतंत्र भारतात विलीन करण्यात आले. सरकारच्यावतीने कै. साळवी यांनी प्रशासक म्हणून सुधागड तालुक्याचा पदभार स्वीकारला.भोर संस्थानातील निरनिराळ्या खातांकडील एकूण २१ लाख जमेपैकी सुधागडचा हिस्सा म्हणून रु. ८ लाख मुंबई सरकारने जिल्हाधिकारी, अलिबाग यांचेकडे वर्ग केले. याच रकमेतून पालीचा पूल, जांभूळपाडा पूल व काही सार्वजनिक विहिरीची बांधकामे करण्यात आले.असे माहिती बामगुडे यांनी दिली.

# प्लस आणि मायनसची चार सूत्रे लक्षात ठेवली तरी जीवनाचे सार्थक होईल : विक्रम देशमुख

**दै.रायगड नगरी । कर्जत**

आपण विद्यार्थी दशेत आहात त्यामुळे आपल्या समोर अनेक प्रलोभने येतील परंतु त्यांचा मोह टाळा. जीवनाचे सार्थक होण्यासाठी मायनस - प्लस, प्लस - प्लस, प्लस - मायनस आणि मायनस - मायनस ही चार सूत्रे लक्षात ठेवा. शेवटच्या दोन सूत्रांच्या वाटेलाही जाऊ नका अन्यथा जीवनाला काहीच अर्थ राहणार नाही. मात्र पहिली दोन सूत्रे अंगिकारली तर जीवनाचे सार्थक नक्की होईल. आपण आपले ध्येय्य ठरवा आणि आपापल्या क्षेत्रात आपण उच्च शिखरावर जाण्यासाठी प्रयत्नशील रहा मात्र चांगले नागरिक होण्याकडे पण लक्ष द्या. मतदान करणे आपले कर्तव्य आहे हे लक्षात ठेवून लोकशाही चे जतन करा' असा महत्वपूर्ण सल्ला तहसीलदार विक्रम देशमुख यांनी येथे विद्यार्थ्यांना दिला. यावेळी त्यांनी प्रश्नोत्तरे घेऊन विद्यार्थ्यांची शाळाच घेतली.

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन सेमिनार हॉल मध्ये करण्यात आले होते. याप्रसंगी तहसीलदार विक्रम देशमुख , नायब तहसीलदार सुधाकर राठोड, परिविक्षाधीन तहसीलदार प्रकाश मेहेत्रे, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, मंडल अधिकारी आप्पा राठोड आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात महाविद्यालयाचा चढता आलेख सादर केला. त्यानंतर स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना व्यासपीठावरील




मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. विजय मांडे यांनी, 'आपण आपल्या क्षेत्रात प्रामाणिक रहा. कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाताना सत्याची कास सोडू नका. कितीही मोठे झालात तरी आपल्या महाविद्यालयाला विसरू नका. सर्वांचा आदर ठेवा.' असे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. मनीषा चौधरी तर आभार प्रदर्शन प्रा. अमोल बोराडे यांनी केले. याप्रसंगी प्रा. निलोफर खान, प्रा. शिल्पा गजबे, प्रा. तनिष्का ठाकरे, रेवती देशपांडे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : तुराडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तुराडे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.अशोक यशवंत धामणकर | १७ | १/अ | ०२.७४.०० पो.ख. ०.२५.०० एकूण क्षेत्र २.९९.०० | ५.६९ |
| २) श्री.अशोक यशवंत धामणकर | १७ | २ | ०.०३.१० पो.ख. ०.००.२० एकूण क्षेत्र ०.०३.३० | ०.१२ |
| ३) श्री.अशोक यशवंत धामणकर | १७ | ४/अ | ०.१०.०० पो.ख. ०.०२.०० एकूण क्षेत्र ०.१२.०० | १.१९ |
| ४) श्री.अशोक यशवंत धामणकर | १७ | ९/अ | ०.१३.४० पो.ख. ०.००.०० एकूण क्षेत्र ०.१३.४० | १.८४ |
| ५) श्रीमती.राधाबाई पुरोषोत्तम धामणकर | १६ | ० | ०.९७.६० पो.ख. ०.०७.१० एकूण क्षेत्र १.०४.७० | ५.६९ |

सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे पत्यावर लेखी नोंदवावी.

वरील विहित मुदतीत कोणचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

दि.३०/०१/२०२२

सही/-
अॅड.चेतन पां. केणी
ऑफिस शॉप नं.१२, तळ मजला,
तुळसी हारमोनी, प्लॉट नं.२६, २७,
सेक्टर १, साई प्रसाद हॉटेल,
खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड


# ऑनलाईन सव्वा लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जलाधर बेज (वय-३६) यांना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या मोबाईलवर मेसेज पाठवून त्यांचे तुमचे एसबीआयचे योनो अकाऊंट कार्ड आज ब्लॉक होणार आहे त्यासाठी पॅनकार्ड अपडेट करण्यासाठी एक लिंक पाठवून त्यावर क्लिक करा असे सांगून त्यांच्या खात्यातून सव्वा लाखांची फसवणुकीची घटना घडल्याने याबाबतची ऑनलाईन फसवणुकीची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : तुराडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तुराडे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.संजय रामहरी घोटे | २० | १ | ०१.२०.९० पो.ख. ०.०५.६० एकूण क्षेत्र ०१.२६.५० | १३.१२ |

सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे पत्यावर लेखी नोंदवावी.

वरील विहित मुदतीत कोणचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

दि.३०/०१/२०२२

सही/-
अॅड.चेतन पां. केणी
ऑफिस शॉप नं.१२, तळ मजला,
तुळसी हारमोनी, प्लॉट नं.२६, २७,
सेक्टर १, साई प्रसाद हॉटेल,
खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड


# एक्टीव्हाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मनोहर शहा (वय-४२) यांनी त्यांची ३० हजारांची होंडा कंपनीची एक्टीव्हा ५जी मॉडेल क्र.-एमएच ४६ बीएल ८३२६ हि रेल्वे स्टेशनच्या गेटजवळील कमानीजवळ उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडी चोरल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषांगिक कामामुळे स्थलांतरीत होणाऱ्या मौजे उलवे येथील बांधकाम क्र. UL-390, UL-390A (संचिका क्र.ULV-ICIG-१६५) ही बांधकामे नारायण चांगु म्हात्रे व गजानन चांगु म्हात्रे यांचेकडून बाधित झालेली आहेत. सदर बांधकामांबद्दल बांधकामधारकांस भूखंड क्र.४८१, सेक्टर-२४, क्षेत्र १७० चौ.मी. व भूखंड क्र.४५७, सेक्टर-२४, क्षेत्र ७० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

| गावाचे नाव | निवाडा क्र./ संचिका क्र. | बांधकाम क्र. | बांधकामधारकाचे नाव | बांधकामाचे छपराखालील क्षेत्र (चौ.मी.) | वाटपित भूखंडाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| उलवे | ULV-ICIG-१६५ | UL-३९०, UL-३९०A | नारायण चांगु म्हात्रे व गजानन चांगु म्हात्रे | १८३.०१ | पुष्पक | २४<br>२४ | ४८१<br>४५७ | १७०<br>७० |

भूखंडधारक नारायण चांगु म्हात्रे हे मयत आहेत. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पनवेल यांचेकडील दिवाणी कि.अर्ज क्र.२९२/२०२१ अन्वये नारायण चांगु म्हात्रे यांचे पश्चात १)श्री. वसंत नारायण म्हात्रे २)श्री. सुभाष नारायण म्हात्रे, ३)श्री. शनिदास नारायण म्हात्रे, ४)श्री. गजानन नारायण म्हात्रे, ५)श्री. समाधान नारायण म्हात्रे यांना कायदेशीर वारस घोषित व प्रमाणित केले आहेत. नारायण चांगु म्हात्रे यांचे वारसांपैकी १)श्री. वसंत नारायण म्हात्रे २)श्री. सुभाष नारायण म्हात्रे, ३)श्री. शनिदास नारायण म्हात्रे, यांनी उपरोक्त नमुद केलेल्या भूखंडामधील त्यांचे हिश्श्याचे अविभाज्य क्षेत्रासाठी १)श्री. गजानन नारायण म्हात्रे, २)श्री. समाधान नारायण म्हात्रे यांचे लाभात हक्कसोड पत्र दिलेले आहे. सदर हक्कसोड पत्र क्र. पवल५-१८-२०२२ पावती-१९ दि.०३.०१.२०२२ रोजी सह दुय्यम निबंधक पनवेल-५ यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्राप्रमाणे सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचे करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| अ.क्र. | नावे |
|---|---|
| १ | १)श्री. गजानन नारायण म्हात्रे<br>२)श्री. समाधान नारायण म्हात्रे |

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत, अशा व्यक्तिंच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे करारनामा करून भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसापर्यंत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ), तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४०९/२०२१-२२


पृष्ठ क्र.१ वरुन...

## मुंबई-पुणे महामार्गावर भीषण अपघात; पाच जणांचा जागीच मृत्यू

सीमाराज तिलोक (३२), शालीमराज तिलोक (१९), महावीरराज तिलोक (३८), वाहन चालक रिहान अन्सारी (२६) पाचही जणांचा मृत्यू झाला आहे.

लोणावळा क्रॉस केल्यानंतर शिलाटणे गावाच्या हद्दीत हा अपघात झाला आहे. हा अपघात इतका भीषण होता की, यामध्ये कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. अपघातग्रस्त गाडीतील नागरिकांना बाहेर काढण्यात आले. मात्र, दुर्दैवाने या अपघातात पाच नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या भीषण अपघातामुळे या महामार्गावर वाहतूक कोंडी झाली आहे.

## माथेरानचा पारदर्शक कारभार हीच खऱ्या अर्थाने पर्यटन क्रांती : महेंद्र घरत

पूर्ण करण्यासाठी सर्वांचा विरोध पत्करून स्वतःच्या जीवाची पर्वा न करता काँग्रेस पक्षाने प्रयत्न केल्यामुळेच शक्य झाले आहे आणि त्यामुळेच शालेय विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी तर व्यापारी दुकानदार यांनाही व्यावसायिक दृष्टीने वाटा मोकळ्या झाल्या आहेत. शटल सेवा सुरू व्हावी यासाठी आम्ही नगराध्यक्ष असताना राज्य रेल्वेमंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर शटल सेवा उपलब्ध झाली आहे, पाणी प्रश्नाबाबतीत मी पदावर असताना डीपीआर केला आहे.एकंदरीत गावाला अभिप्रेत पायासुविधाकडे आम्ही प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले होते. असे मनोज खेडकर यांनी स्पष्ट केले. महिला आघाडी अध्यक्षा वर्षा सुनील शिंदे यांनी आपले अनमोल विचार यानिमित्ताने व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राकेश कोकळे यांनी केले.

## नागोठण्याला पुन्हा एकदा बालेकिल्ला बनविण्यासाठी तरुणांनो कामाला लागा : खा. सुनील तटकरे

दिलीप आवाद, विभागीय युवक अध्यक्ष प्रमोद जांबेकर, कार्याध्यक्ष दीपेंद्र आवाद, राजू शिंदे, किशोर कदम, किसन बोरकर, निवास पवार, अमित जांबेकर, अतुल काळे, राजेश पिंपळे, रोशन पारंगे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खा. सुनील तटकरे यांनी नुकत्याच आयोजित केलेल्या तालुक्यातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात पक्षाचे ज्येष्ठ नेते मधुकर ठमके यांनी व्यक्त केलेल्या मनोगताचा उल्लेख करीत १९८४ सालच्या बॅ. अंतुले साहेबांच्या निवडणुकीत पतित पावन संघटनेचे विलास तुपेही निवडणूक लढवीत असल्याने आम्ही अंतुले साहेबांचे काम करीत असल्याने आपल्यावर हल्ला करायला आलेल्या गुंडांनी वरसगाव नाक्याऐवजी वाकण नाक्यावर केलेला हल्लयात आमडोशीतील तुळशीराम जांबेकर यांचा झालेला खून व देविदास गायकर यांना झालेली मोठी दुखापत व आपण त्यावेळी एका दुसऱ्याच ठिकाणी पूजेकरिता गेलो असल्याने कशाप्रकारे वाचलो तसेच या हल्लयाची माहिती मिळताच नागोठण्याहून तात्यासाहेब टके यांनी वडिलकीच्या नात्याने कोलाड येथे आपल्या घरी येऊन मला कुठेतरी दूर पाठविण्यासाठी माझ्या आईला सांगितले अशा आठवणींना यावेळी खा. तटकरे यांनी उजाळा दिला. मी आज दुपारीच दिल्लीला जाणार होतो, मात्र भाई टकेंनी मला या प्रवेश सोहळ्यासाठी थांबण्याचा आग्रह केल्याने व दिल्लीला जाताना एकनाथ ठाकूर यांना पक्षात घेऊनच जायचे ठरविल्याने मी थांबलो. तसेच औद्योगीकरणाचा जसा फायदा होत असतो तसाच काळत-नकळत तोटा कसा होतो हे सुप्रीम पेट्रोकेम कंपनीच्या निमित्ताने अनुभवायला येत असल्याने आठ दिवसांनी दिल्लीवरून आल्यानंतर राजकारण करणाऱ्या सुप्रीमला वठणीवर आणले जाईल व ज्याप्रमाणे आमडोशी येथील श्री माणकेश्वर मंदिराच्या तलावाच्या रूपाने विभागातील तलावांच्या शुशोभीकरणाच्या कामांची सुरुवात करून वांगणी ग्रामपंचायतीमधील वाड्या-वस्त्यांवर विकासगंगा पोहोचविली त्याचप्रमाणे तुम्ही सुरुवात करा मग बघा वांगणीवरही आपला झेंडा फडकेल असा विश्वास खा. तटकरे यांनी प्रवेशकर्त्यांना दिला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## डिकसळ येथे महिलांसाठी हळदीकुंकू



**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ पोलीस ठाणे अंतर्गत डिकसळ येथे महिलांसाठी हळदी कुंकू आयोजित करण्यात आले. तेथील महिला मंडळ आणि रमाबाई महिला मंडळ यांच्या माध्यमातून हा संत आयोजित करण्यात आला होता.

रायगड जिल्हा परिषद शाळा डिकसळ येथे हळदी कुंकवाचा कार्यक्रम डिकसळ महीला मंडळ, रमाबाई महिला मंडळ यांनी आयोजित केला होता. नेरळ पोलिस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक माधुरी मुळीक यांच्या अध्यक्षतेखाली महिलांना मार्गदर्शन करण्याच्या निमित्ताने हळदी-कुंकू चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पोलीस उपनिरीक्षक जवादे, डिकसळ येथील पोलीस पाटील सरिता शेळके, उमरोली ग्रामपंचायतच्या माजी सरपंच मोनिका साळोखे, माजी उपसरपंच भारती पाटील, सदस्या संध्या पाटील आदी उपस्थित होते. महिला पोलिस उपनिरीक्षक माधुरी मुळीक यांनी महिलांवर होणारे हत्याचार महिलेने कसे सक्षम असणे तसेच महिलांना जागरूक असावे असे आवाहन केले. महिला वर्गाने आपल्या मुलांवर संस्कार चांगले झाले पाहिजेत यासाठी मार्गदर्शन केले.

## दिवंगत विद्यार्थी मित्राला आर्थिक मदत

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील पोशीर येथील श्रमजीवी विद्यालयात १९९७मध्ये दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थी पैकी एक माजी विद्यार्थी कोरोना काळात मृत पावला होता. त्या मृत मित्राला त्यांच्या अन्य सहकारी माजी विद्यार्थी मित्रांनी एकत्र येऊन आर्थिक मदत केली. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करीत असताना पेण येथील कासू येथे राहणार एक वर्ग मित्र मागील वर्षी कोरोना मध्ये मृत पावला होता.त्या मृत मित्राला आर्थिक मदत करण्यासाठी १९९७ मध्ये दहावी ची परीक्षा देणारे माजी विद्यार्थी शिक्षक बी एन पाटील यांच्या आवाहनानंतर एकत्र आले होते. त्या वेळी सर्व माजी विद्यार्थी यांनी एकत्र येत ५१ हजाराची मदत संकलित केली अशी माहिती माजी विद्यार्थ दिनेश कालेकर यांनी दिली.

# नवी मुंबईत महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये वाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे. २०२१ या वर्षामध्ये महिलांशी संबंधित बलात्कार, विनयभंग, हुंडाबळी, छळवणूक त्याचप्रमाणे छेडछाडीचे असे तब्बल ६५८ गुन्हे दाखल झाले आहेत. २०२० या वर्षाच्या तुलनेत २०२१ या वर्षात बलात्कार आणि विनयभंगासह महिलांवरील हिंसाचाराच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे उपलब्ध आकडेवारीवरुन दिसून येत आहे. त्यामुळे महिलांसाठी नवी मुंबई किती सुरक्षित आहे? यावर सर्वसामान्य नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयच्या हद्दीत सन- २०२० मध्ये बलात्काराच्या १२७ घटना घडल्या असून त्यापैकी १२६ गुन्हे उघडकीस आले आहेत. मात्र, २०२१ या वर्षामध्ये नवी मुंबईत २१२ बलात्काराच्या घटना घडल्या आहेत. यात अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचाराचे (पोक्सो) सुमारे ८५ गुन्हे दाखल आहेत. यातील २११ गुन्हे उघडकीस आणून आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. यावरुन मागच्या वर्षीच्या तुलनेत २०२१ वर्षामध्ये बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये ८५ ने वाढ झाल्याचे दिसून येत आहे. यात लग्नाचे आमिष दाखवून, नोकरीचे आमिष दाखवून, शेजाऱ्यांकडून, नातेवाईक यांच्याकडून, मित्र-ओळख करुन मैत्री करुन बलात्काराच्या घटना घडल्याचे दिसून येत आहे. यातील सर्वात जास्त बलात्काराच्या घटना या ओळखीच्या व्यक्तीकडून झाल्याचे आढळून आले आहे. सदर घटनांबरोबरच महिलांवरील विनयभंगाच्या गुन्ह्यात देखील वाढ होताना आकडेवारीवरुन दिसून आले आहे. २०२० मध्ये १९८ विनयभंगाचे गुन्हे दाखल झाले असून त्यातील १८७ गुन्हे उघडकीस आले आहेत. तर २०२१ मध्ये २१४ विनयभंगाचे गुन्हे घडले असून त्यातील २०५ गुन्हे उघडकीस आले आहेत. सदर आकडेवारीवरुन विनयभंगाच्या गुन्ह्यात देखील साधारण १५ ने वाढ झाल्याचे दिसून येत आहे. गतवर्षी महिलांच्या छेडछाडीचे २४ गुन्हे दाखल झाले होते, त्यापैकी २१ गुन्हे उघडकीस आले होते. तर २०२१ मध्ये महिलांच्या छेडछाडीचे २६ गुन्हे दाखल असून यातील २२ गुन्हे उघडकीस आले आहेत.

२०२० या वर्षामध्ये हुंडाबळीचे १४ गुन्हे दाखल झाले असून २०२१ वर्षात त्यासंबंधीचे १५ गुन्हे घडल्याची नोंद आहे. २०२० या वर्षात महिलच्या छळवणुकीचे (४९८ए नुसार) ९४ गुन्हे दाखल झाले होते. मात्र, २०२१ या वर्षामध्ये छळवणुकीचे १९० गुन्हे दाखल झाले आहेत. यावरुन महिलावरील कौटुंबिक हिंसाचाराच्या (छळवणुकीच्या) घटनांमध्ये देखील नवी मुंबईत वाढ होताना दिसून येत आहे. लॉकडाऊनच्या काळात अनेक कुटुंबात पती-पत्नी मधील वाद टोकाला गेल्याने महिलांकडून कौटुंबिक छळाच्या तक्रारीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. कौटुंबिक छळवणुकीच्या तक्रारीच्या संख्येत वाढ होत असल्याने देखील चिंता व्यक्त करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या घटनामध्येही वाढ होताना दिसून येत आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून २०२१ या वर्षामध्ये सुमारे ३०० अल्पवयीन मुला-मुलींचे अपहरण झाल्याची नोंद विविध पोलीस ठाण्यात झाली आहे. यात मुलींची सर्वात जास्त संख्या आहे. यातील सुमारे १८५ मुला-मुलींचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे. अपहरण झालेल्या मुलींपैकी बहुतेक मुली या १५ ते १७ या वयोगटातील असून बहुतांश मुलींना प्रेम प्रकरणातून तसेच लग्नाचे आमिष दाखवून त्यांना पळवून नेण्यात आल्याचे तपासात आढळून आले आहे. यातील अनेक मुलींनी प्रेमप्रकरणातून लग्न देखील केल्याचे आढळून आले आहे.

## ग्राहकाचे विसरलेले 3 लाख रुपये परत केल्याने शिरढोणच्या 'संग्राम हॉटेल'चे सर्व स्तरातून कौतुक

**दै.रायगड नगरी । उरण**

आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या शिरढोण गावाच्या पवित्र भूमीत असणाऱ्या'संग्राम हॉटेल'ने आपल्या ग्राहकाचे विसरलेले ३ लाख रुपये ग्राहकाला परत करून 'ग्राहक देवो भव' हे शब्द खर्या अर्थाने सत्यात उतरवले आहेत. 'ग्राहकांचे समाधान हाच आमचा ध्यास' हे ब्रिदवाक्य समोर ठेवून स्वर्गीय नारायणशेठ बाळू भोपी यांनी सुरू केलेले हॉटेल संग्राम आज त्यांचे चिरंजीव संग्राम भोपी तितक्याच तळमळीने आणि प्रामाणिकपणे चालवत आहेत हे या घटनेवरून दिसून येते.



पेण तालुक्यातील शिर्की गावातील माजी सरपंच कल्पेश पाटील हे शिरढोण गावालगतच्या संग्राम हॉटेलमध्ये शनिवार, दि. १५ जानेवारी रोजी सायंकाळी जेवणासाठी आले होते. मिठाचा व्यवसाय करणारे कल्पेश हे मिठ विक्रीतून मिळालेले पैसे घेऊन शिर्की येथे परतत असताना ते संग्राम हॉटेलवर उतरले. एका पिशवीमध्ये त्यांनी तीन लाख रुपयांची रोकड ठेवली होती. जेवण करून झाल्यानंतर घाईगडबडीत आपल्या कारने ते पेणकडे गेले. पण पैशाने भरलेली पिशवी ते हॉटेलवरच विसरले. ही बाब हॉटेलच्या कर्मचार्याने संग्राम हॉटेलचे मालक संग्राम भोपी यांच्या निदर्शनास आणून दिली. संग्राम भोपी यांनी तातडीने सापडलेले पैसे सुरक्षित जागी ठेवून ते पैसे कोणत्या ग्राहकाचे आहेत, याची खातरजमा करून घेतली. शिर्की येथील कल्पेश पाटील यांचे पैसे विसरल्याचे लक्षात आल्यानंतर संग्राम भोपी यांनी आपल्या पेण येथील नातेवाईकांमार्फत त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात पेण येथून पैसे हरवल्याबाबत संग्राम यांना विचारणा करणारा कॉल आल्यानंतर संग्राम भोपी यांनी ग्राहकांचे सर्व पैसे सुरक्षित असल्याचे सांगितले. रविवार, दि. १६ जानेवारी रोजी आपले पैसे परत मिळाल्यानंतर कल्पेश पाटील यांनी संग्राम हॉटेलचे मालक संग्राम भोपी यांचे आभार मानले.

## वाशी येथुन साई दिंडीचे शिर्डीला प्रयाण

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील ओम साई पायी दिंडी मंडळ वाशी विभाग यांचे विघमाने आयोजित करण्यात आलेल्या वाशी ते शिर्डी पाई साई दींडी पालखीचे आयोजन करण्यात आले. या पालखी सोहळ्यामध्ये साई भक्त सहभागी झाले होते. कोरोना नियमाचे पालन करीत राष्ट्रीय एकात्मता, व्यसनमुक्ती, स्वच्छतेचा संदेश या पालखी सोहळ्यात देण्यात आला. व या पालखी सोहळ्यात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आसल्याचे ओम साई पायी दिंडी मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत मढवी, उपाध्यक्ष कमलाकर म्हात्रे, सचिव नरेश म्हात्रे, सहसचिव महेंद्र ठाकूर यांनी सांगितले.

## बकरी चोर शहर पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातून बकरी चोरी करणाऱ्या दोघांपैकी एकाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

हाजी रमजान सय्यद रा.विश्राळी नाका, पनवेल शहर या ठिकाणी यांच्या काही बकऱ्या परिसरात फिरत असताना सराईत बकरी चोर सलीम बाबु शेख (४३) व त्याचा सहकारी या दोघांनी त्यांच्याकडे असलेल्या चार चाकी गाडीमध्ये त्या बकऱ्यांपैकी तीन बकऱ्या गाडीत टाकून ते पसार झाले. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वपोनि विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहा.पो.निरीक्षक दळवी, पो.उपनिरीक्षक शिंदे व त्यांचे पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदाराद्वारे सदर आरोपी-ीचा माग काढून त्याला चेंबुर परिसरातून ताब्यात घेतले असून गुन्ह्यातील तीन बकऱ्या व गुन्ह्यात वापरलेली गाडी असा मिळून जवळपास लाखो रुपये किंमतीचा ऐवज हस्तगत केला आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असून यापूर्वी सुद्धा त्याने मुंबई परिसरात अशा प्रकारच्या चोरीच्या घटना केल्या आहेत.

# रायगड जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागाची मदार निम्म्याहून कमी डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



रायगड जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागा अंतर्गत पशुधन विकास अधिकारी (गट-अ) या संवर्गाच्या ५४ पदांपैकी तब्बल ३० पदे रिक्त आहेत. तर पशुधन पर्यवेक्षकांची ७९ पैकी ४२ पदे रिक्त आहेत. पशुधन टिकवने काळाची गरज असली तरी रिक्त पदे असतील तर कामकाज कसे चालणार? असा सवाल उपस्थित होतोय.

तर तांत्रिक अधिकारी यांचे असणारे एकमेव पद देखील रिक्त आहे. परिणामी पशुसंवर्धन विभागाच्या सर्वच कामांवर अतिरिक्तभार येत आहे. अनेक कामे देखील खोळंबत आहेत. शिवाय पशुधनाचे आरोग्य धोक्यात येत आहे. या रिक्त पदांमुळे रायगड जिल्ह्यातील पशुपालकांच्या पशुधनास लसीकरण करणे, कृत्रिम रेतन, उपचार करणे, खच्चीकरण व ई सेवा प्रदान करतांना प्रचंड अडचणी येत आहेत. उपलब्ध डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर ३-४ ठिकाणचा अतिरिक्त कार्यभार पडत आहे. यामुळे संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांना प्रचंड अडचणींना सामोरे जाऊन ताण सहन करावा लागत आहे. अपुऱ्या तांत्रिक मनुष्यबळाचा प्रत्यक्ष परिणाम हा जिल्ह्यातील पशुसंवर्धन विषयक व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांवर होत आहे. त्यांना या सर्व सेवा वेळेवर मिळत नाहीत. तसेच विविध शासकीय योजना जिल्ह्यातील ग्रामीण भागातील तळागाळातील पशुपालक, शेतकरी व गरजू नागरिकांना पोहोचवण्यात प्रचंड अडचणी व समस्या उद्भवत आहेत. यामुळे हकनाक पशुसंवर्धन विभागास जिल्ह्यातील लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

## मनोरुग्ण महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका आश्रमात असलेली महिला बेपत्ता झाल्याची घटना तालुक्यातील वांगणी येथील सिल आश्रम येथे घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पत्तु देवीनायकम (४५) रंग काळा, टक्कल केलेला आहे. डोक्याच्या उजव्या बाजूला मोठी जखम व त्यावर टाके घातलेले आहेत. उंची ५ फुट असून अंगात सलवार कमीज आहे. सदर स्त्री ही मनोरुग्ण आहे व तिला तामिळ भाषा बोलता येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२४४४ किंवा पो.हवा.अमोल कांबळे यांच्याशी संपर्क साधावा.


मुजावर सो.कोर्ट

प्रो.जमा. २-२५ अर्जदाराचे वकील : ॲड.श्रुती द. शिंदे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.६०९/२०१९

नि.नं.११/ड

ने.ता. १०/०३/२०२२

कै.रघुनाथ बामा भगत (मयत) तर्फे वारस
१) श्री.रामचंद्र रघुनाथ भगत
वय : ५६ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.सदानंद रघुनाथ भगत
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.मोहन रघुनाथ भगत
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.प्रमोद रघुनाथ भगत
वय : ४३ वर्षे, धंदा : शेती
५) श्रीमती.पद्मा उर्फ पद्मावती गणेश पाटील
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
वरील सर्व रा.धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी कै.रघुनाथ बामा भगत हे दि.१८/०४/१९९६ रोजी मौजे : धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन (अ)**
**मौजे : धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस क्र. |
|---|---|---|---|
| ८७ | ०६ | ०-०४-० | २९०+२५४(२)/१९ |
| १०३ | ०६ | ०-१४-८ | २९०+२५४ |
| ५७६ | १+२ | ०-५२-९ | २९४ |
| ५०९ | ०३ | ०-१४-१२ | २९४ |
| ५१७ | २ | ०-०३-०४ | २९४ |
| ५२१ | २ | ०-०७-०० | २९४ |
| ५२६ | ० | ०-१३-१२ | २९४ |
| ५२८ | १ | ०-०९-०० | २९४ |
| ५६३ | २ | ०-३०-०० | २९४ |
| ५६६ | २ | ०-१६-० | २९४ |
| ५९५ | ७ | ०-१५-४ | २९४ |
| ५६४ | २ अ | ०-१९-४ | २९४ |
| ७२६ अ | १ | १७-५८-१ | २९४ |
| ७०० | I-C/B | ०-२९-१ | २९४ क |
| ७२९ | ८ | ०-५२-७ | २९४ क |
| ७०० | ४ | ०-६१-७ | २९४ क |
| ७१० | P | ०-७-३ | २९४ क |
| ७१४ | ३ | ०-५-६ | २९४ क |
| ७१६ | १ | ०-१५-६ | २९४ क |
| ७२४ | । | ०-१२-१ | २९४ क |
| ७२२ | ३ | ०-०४-० | २९४ क |
| ७२६ अ | १ | ०-५२-९ | २९४ |

ब) तसेच कै.रघुनाथ बामा भगत यांचे नावे मौजे : धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड येथील ग्रामपंचायत वडघर यांचे हद्दीतील खालील वर्णनाची घर मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन (ब)**
**मौजे : धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड**

| पनवेल महानगरपालिका | घर क्र. | क्षेत्र चौ.मीटर |
|---|---|---|
| धाकटा खांदा | ७९/अ | |

कै.रघुनाथ बामा भगत यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २९/१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



श्री.मुजावर साहेब

अर्जदारांतर्फे वकील
सौ.सुप्रिया रुपेश मोरे
श्री.सागर सुरेश गोंधळी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.७२/२०२१

नि.नं.१५/ड

ने.ता. ०५/०३/२०२२

मयत कै.जनाबाई काथोर पाटील
मयत तर्फे वारस
मयत कै.बाळाराम काथोर पाटील
मयत तर्फे वारस
१) कु.नविन बाळाराम पाटील
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
२) कु.हरेश बाळाराम पाटील
वय : २५ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्रीमती.नर्मदा बाळाराम पाटील
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
राहणार वरील तिघेही मु.घोट,
पो.कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी जनाबाई काथोर पाटील ही दि.१९/०५/२०११ रोजी मौजे : चाळ, ता.पनवेल येथे मरण पावली असून त्यांचा मुलगा बाळाराम काथोर पाटील हा दि.२८/०८/२००२ रोजी मौजे : चाळ, ता.पनवेल येथे मरण पावला असून यांच्या सामाईक मालकीच्या खालीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी दि.३/२/१९७० रोजीचे नोटीफिकेशनद्वारे नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केल्या आहेत. तसेच तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी व तालुका : पनवेल येथील मौजे : चाळ येथे शेतजमीन मिळकत आहे.

**साडेबारा टक्केसाठी संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : चाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| युनिट केस नं. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| ९४/२० | चाळ | ६३ | १ ब | ०-४३-०० | ४.२५ |

सदर संपादीत साडेबारा टक्के मिळकत ही सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी मयत कै.जनाबाई काथोर पाटील व कै.बाळाराम काथोर पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२९ माहे ०१ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



प्रो.जमा.६-२५ अर्जदाराचे वकील ॲड.सागर गोंधळी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.१६५६/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता. १४/०२/२०२२

१) श्री.दिनकर मुळ्या पाटील
वय : वर्षे, व्यवसाय : शेती
२) सौ.चांगुणा दिनकर पाटील
वय : वर्षे, व्यवसाय : गृहिणी
३) कुमारी उज्वला दिनकर पाटील
वय : वर्षे, व्यवसाय : गृहिणी
सर्व अर्जदार रा.टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

ज्याअर्थी कै.हरिचंद्र दिनकर पाटील हे दि.०२/०१/२०१७ रोजी सिव्हील हॉस्पिटल ठाणे, ता.जि.ठाणे, येथे मयत पावले असून त्यांचे नावे खालील वर्णन केलेल्या घर मिळकती आहेत. त्या घर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड**
**१) घर नं.५६ अ, क्षेत्र २०.०७ चौ.मी. कौलारु पक्के घर,**
**मौजे : टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड**
**२) घर नं.५७ क्षेत्र, २०.०७ चौ.मी. कौलारु पक्के घर,**
**मौजे : टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.हरिचंद्र दिनकर पाटील यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस असून त्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.सोनवणे साहेब

प्रो.जमा.६-२५ अर्जदाराचे वकील ॲड.विजय गडगे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.८८/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता. ११/०४/२०२२

अकील इकबाल पटेल
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.तळोजा पाचनंद, तळोजा मजकूर,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

ज्याअर्थी मयत ऐशाबी अ. गफुर तांबडे ही दि.११/०५/१९८२ रोजी मौजे : मु.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावली असून ती मृत्यूपूर्वी मौजे : पाचनंद तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत होती. तीचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र-हे.ए.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पिसार्वे | ३७ | ३/४/अ | ०-२९-८० पो.ख. ०-००-५० | ५.३१ |

मयत ऐशाबी अ.गफुर तांबडे हिचे मृत्यूपश्चात तीस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २९/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली

सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## मराठी भाषा संवर्धन पंधरावडा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील पुगांव केंद्राचे वतीने प्राथमिक शाळा खांब येथे मराठी भाषा संवर्धन पंधरावडा उत्साहात संपन्न करण्यात आला. पं.समिती गट शिक्षणाधिकारी सादूराम बांगारे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व बीट विस्तार अधिकारी तथा केंद्रप्रमुख कनोजे यांच्या सहकार्याने संपन्न झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी केंद्रातील सर्वच शाळांनी या निमित्ताने संपन्न करण्यात आलेल्या निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा आदी उपक्रमात हिरहिरीने भाग घेतला. तर शिक्षक वर्गाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला प्रेरणा मिळावून देण्यासाठी प्राथ.शाळा खांब येथे शिक्षकांचेही यानिमित्ताने संमेलन भरविण्यात आले होते.

याप्रसंगी सर्वप्रथम सरस्वती व ग्रंथाचे पूजन करण्यात आले. तर निवास थळे यांनी मराठी भाषा संवर्धन याबाबत व्याख्यान तसेच स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. तसेच उपस्थित शिक्षक वर्गानी आयोजित परिसंवाद कार्यक्रमात मराठी भाषा संवर्धनाबाबत आपले विचार व्यक्त करून आपल्या स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. यावेळी रत्नाकर कनोजे( बिटविस्तार अधिकारी, कोलाड व केंद्रप्रमुख पुगाव), निवास थळे पुगाव , गहिनाथ उस्तुरे, खांब शाळा, निलकंठ कदम मढाळी बु., सुप्रिया अधिकारी, खांब शाळा, लता भोईर नडवली, लीना खराडे, तळवली तर्फे अष्टमी, वैशाली सलागरे धानकान्हे, सोनाली सकपाळ तळवली तर्फे अष्टमी, मदन गिर्हे चिल्हे, शरद पवार चिल्हे, बालाजी राठोड धानकान्हे आदिवासीवाडी शाळा, रवी लाडगे नडवली आदिवासीवाडी श्री प्रसाद साळवी पुगाव, सिध्दार्ध मुजमुळे मढाळी बु , आदी उपस्थित होते. विस्तार अधिकारी रत्नाकर कनोजे यांनी प्रस्तावित सादर करून मराठी भाषा संवर्धनासाठी आपली भूमिका काय असेल याबाबत मनोगत व्यक्त केले.



# मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील घुम-रुद्रवट गावांचे मंजूर मुख्य रस्त्याचे काम रखडले

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

राज्यातील मागील भाजप सरकारच्या काळात रायगड जिल्ह्यात काही तालुक्यातील अनेक गावातील जोड रस्त्यांच्या कामांना मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजुरी मिळाली आहे. म्हसळा तालुक्यातील देखील काही गावातील जोडरस्त्यांना मुख्यमंत्री सडक योजनेतून मान्यता मिळाली आहे परंतु ठेकेदारांच्या हलगर्जीपणामुळे व या योजनेशी संबंधित असलेल्या अधिकारी वर्गाच्या दुर्लक्षित भूमिकेमुळे रस्त्यांच्या दुरुस्ती कामांना विलंब होत आहे व याचा स्थानिक नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत म्हसळा तालुक्यातील घुम-रुद्रवट (ओडीआर १२८ ते पानवे रस्ता) या दोन गावांसाठी अडीच वर्षांपूर्वी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमधून नवीन रस्त्याचे कामाला एक कोटीच्या निधीची मंजुरी मिळाली आहे. मागील दोन वर्षांपूर्वी रस्ता विकास कामाचा ठेका मयुरी कॅट्रक्शन, तुर्भे नवी मुंबई यांचे नावे घेतलेला असुन तो तयार करण्यासाठी अन्य एका पोट ठेकेदाराकडे वर्ग केला होता. संबंधित ठेकेदाराकरवी रस्ता दुरुस्ती व सुधारणा कामात खुपच दिरंगाई केल्याने त्या ठेकेदार कंपनीला ब्लॅक लिस्ट मध्ये टाकून त्या कंपनीकडून हे काम काढून घेण्यात आले आहे अशी माहिती संबंधित अधिकारी वर्गाकडून व लोकप्रतिनीधिंकडून मिळाली आहे.

जानेवारी २०१९ मधे घुम -रुद्रवट रस्त्याचे दुरुस्ती कामाला सुरूवात करावयाची होती परंतु ठेकेदाराने कामात दिरंगाई केली असून नवीन रस्ता तर झालाच नाही परंतु जो रस्ता होता त्याच्या दोन्ही बाजूला साईड पट्टी खोदून ठेवल्याने मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्याचबरोबर गावांना जोडणारा नदीवरील मुख्य साकव दुरुस्ती साठी तोडला होता त्याचीही डागडुजी अर्धवट ठेवली आहे. रस्ता चांगल्या प्रकारे दुरुस्ती झाला नाही तर येथे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. घुम फाटा ते रुद्रवट गावापर्यंत हा रस्ता तर झालाच नाही शिवाय नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळून रस्त्याचे दोन्ही बाजूला खोदून काम अर्धवट ठेवल्याने तालुक्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील मंजूर कामाची ऐशी की तैशी करून टाकली असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

पहिल्या ठेकेदाराने रस्ता दुरुस्तीचे अन्य कोणतेही काम न करता फक्त नदीवरील साकव बांधला असून तो साकवही अपूर्णच आहे.



१५ वर्षांपासून चांगल्या रस्त्याच्या प्रतीक्षेत असलेल्या घुम फाटा ते रुद्रवट गावापर्यंत मंजूर रस्त्याचे काम रखडले असून रस्ते विकासक कामांचे ठेकेदाराचे दिरंगाई व मनमर्जी कारभारामुळे नागरिकांना अतोनात यातना सहन कराव्या लागत आहेत. निवडणुका जवळ आल्या किंवा अन्य काही कार्यक्रम असले की रस्त्याचे कामाला आज ना उद्या सुरुवात होईल असे सहानुभूती पूर्वक उत्तर अनेकांकडून ऐकायला मिळतात असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

घुम, रुद्रवट या दोन्ही गावातील आजारी, वयोवृद्ध नागरिक, विद्यार्थी, दैनंदिन कामासाठी प्रवास करणारे प्रवाशी नागरिक यांना रस्त्याचे काम न झाल्याने खूप त्रास सहन करावा लागत असून नाहक यातना होत आहेत. मागील १५ वर्षांपासून घुम रुद्रवट रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्याचे दुरवस्था बाबत अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या असून याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे.

रस्ता पूर्णपणे उखडला असून मोठमोठे खड्डे पडले आहेत तर काही ठिकाणी दगड गोटे निघाले असून लाल माती बाहेर आली आहे, रस्त्याला वेडी वाकडी वळणे असल्याने व रस्ता चढ - उतार भागाचा असल्याने अनेक ठिकाणी बारीक रेती सदृश्य खडी माती जमा झाली आहे. या खडी मातीवरून अनेक वेळा मोटारसायकल स्वार, तरुण पडून जखमी झाले आहेत. तर अन्य वेगवेगळ्या अपघातांना सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावरून गाडी चालविणे तर सोडाच पण पायी चालणे सुद्धा अवघड होऊन बसले आहे, गावातील आजारी माणसे, विद्यार्थी, गरोदर महिला, वयोवृद्ध नागरिक कसेबसे या रस्त्यावरून प्रवास करीत आहेत.

## वाजे येथील भाजप व शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते शिवसेनेत दाखल



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना नेते व कोकण विभाग संपर्क नेते तथा राज्याचे उद्योग व खनिकर्म मंत्री सुभाष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कोकण महिला संपर्क नेत्या किशोरी पेडणेकर, शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली व पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल यांच्या विशेष प्रयत्नाने ग्रुप ग्रामपंचायत वांगणीतर्फे वाजे येथील भाजपा व शेकापचे अरूण कोंडीराम जळे (ग्रुप ग्रामपंचायत सदस्य अंबिवली), चिंतामणी सुरेश शेलके (ग्रुप ग्रामपंचायत सदस्य पाली खुर्दा), सुषमा नितीन कडव (ग्रुप ग्रामपंचायत सदस्या मोहो), हरिश्चंद्र बुधाजी कडव (माजी ग्रुप ग्रामपंचायत सदस्य मोहो), कविता रमेश कडव (माजी ग्रुप ग्रामपंचायत सदस्या मोहो) या सर्व पदाधिकारी, सदस्य व सहकाऱ्यांनी शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला.

यावेळी तालुका संघटक भरत पाटील, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, विभाग प्रमुख विशाल भोईर, सात गाव स्थानिक शेतकरी कमिटी अध्यक्ष रोशन कडव, उद्योजक अनंताशेठ पाटील, अरूण पाटील व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

### युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांना मेल करताच २४ तासांत कारवाई

## शाळेने फी कमी करून तातडीने परीक्षेस बसायला दिली अनुमती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथील सेंट जोसेफ शाळेत इयत्ता १० वी मध्ये शिकत असलेल्या गुंजन ह्या विद्यार्थिनी ला गेल्या ७-८ महिन्या पासून शाळा फी साठी त्रास देत होती. याबाबतची तक्रार पालकांनी युवा सेनेकडे करताच युवा सेनेच्या प्रयत्नाने सदर मुलाची शाळेने फी करून तातडीने परिक्षेस बसायला अनुमती दिली आहे.

गुंजनचे वडील नसल्याने घरी हलाकीची परिस्थिती आहे, आई आणि मामा यांज कडून घर चालत असतांना ह्याच शाळेत घरातील २ मुले शिकत आहेत, सुरुवातीची फी दिलेली असतांना बाकी फी मध्ये शाळेने आई एकटी कमावते म्हणून फी मध्ये सवलत देण्याचे वचन दिले होते मात्र तसे न होता सरसकट फी भरण्यास सांगितले आणि फी भरली नाही तर उद्या होणाऱ्या १० वी च्या टेस्ट परीक्षेत बसता येणार नासल्याचे शाळेच्या प्रिन्सपल यांनी सांगितले.

खूप विनवणी केल्या नंतर ही शाळा जुमानत नसल्याने शेवटी पालकांनी युवासेना प्रमुख, पर्यटन तथा पर्यावरण मंत्री यांना थेट मेल करून ह्या बाबत तक्रार केली. तातडीने सदर आदेश रायगड व नवीमुंबई येथील काम पाहणारे युवासेनेचे सह सचिव रुपेश पाटील यांना युवासेना कार्यकारणी सदस्य साईनाथ दुर्गे यांच्या मार्फत आले असतांना तातडीने पालकांना भेटून सर्व प्रकार सह सचिव रुपेश पाटील यांनी जाणून घेतला व ह्या बाबत थेट



रायन ग्रुप च्या हेड श्रीमती आलीस यांना विचारला आणि हे प्रकरण तातडीने सोडविले नाही तर शाळेत आंदोलन करण्याचे सूतोवाच दिले. दुसऱ्या दिवशी सकाळीच शाळेने पालकांना बोलावून परीक्षेचा फॉर्म भरून दिला व फी बाबत सवलत युवासेनेची मागणी मान्य केली. ७ महिण्याचा त्रासावर एक तक्रारी नंतर २४ तासांत न्याय मिळाला या बाबत पालकांनी युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांचे व सह सचिव रुपेश पाटील यांचे आभार मानले. कोविड नंतर असे अनेकांना आर्थिक संकट आले आहे अशावेळी शाळा किंवा कॉलेज किंवा इतर ठिकाणी त्रास असेल तर त्यांनी तातडीने रुपेश पाटील यांना संपर्क करावा असे आवाहन यांनी केले आहे.

## सनियंत्रण समितीच्या अधिकाऱ्यांनी जाणून घेतल्या माथेरानच्या समस्या

**दै.रायगड नगरी । माथेरान**

दिवसेंदिवस माथेरान हे सुंदर पर्यटनस्थळ विकासाच्या दिशेने आगेकूच करीत आहे. त्यातूनही आजही इथे अनेक प्रश्न, समस्या,स्थानिकांच्या अडीअडचणी, पर्यटकांना आवश्यक मूलभूत सेवासुविधा प्रलंबित आहेत याचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे यासाठी दि.२८ रोजी नगरपरिषदेच्या कार्यालयात माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी येथील विविध समस्या सनियंत्रण समितीच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत आणि त्यावर नक्कीच ठोस उपाययोजना करण्यात येणार आहे असे आश्वासन सनियंत्रण समितीचे चेअरमन के. पी. बक्षी,राकेश कुमार, डेव्हिड कार्डोज



आदी उपस्थित होते.

माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांना आपल्या मोटार गाडया पार्किंग करण्यासाठी दस्तुरीनाक्यावर अपुरी व्यवस्था आहे. तेथील एम.पी. ९३ हा रिक्त प्लॉट ताब्यात घेऊन तेथील अतिक्रमण दूर केल्यास नक्कीच मोठया प्रमाणावर मोटार गाड्यांची सोय उपलब्ध होऊ शकते त्याचप्रमाणे इथल्या वनराईचे संरक्षण करण्यासाठी जागोजागी तारेचे कुंपण केल्यास झाडी कायमस्वरूपी अबाधित राहू शकते असे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी सांगितले तर सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदेंनी सुध्दा आपले विचार यानिमित्ताने व्यक्त केले. यावेळी माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, शकील पटेल, प्रकाश सुतार आदी उपस्थित होते.

## सुधागडात प्रस्तरारोहण व गिर्यारोहणाला हक्काचे आंदण

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

रायगड जिल्ह्यासह सुधागड तालुक्यातील सह्याद्रीच्या प्रशस्त डोंगररांगा आणि त्यावरील कातळ खडक प्रस्तरारोहक व गिर्यारोहकांना आवाहन देतांना दिसत आहेत. पालीतील सरसगड व सुधागड किल्ल्यासमोरील कठीण व भारदस्त तैलबैला सुळक्यावर प्रस्तरारोहण व गिर्यारोहण मोठ्या प्रमाणात होत आहे. येथे प्रस्तरारोहक व गिर्यारोहकांना सराव व नवे रेकॉर्ड बनविण्यासाठी हक्काचे आंदण मिळाले आहे. आगामी काळात जिल्ह्यातील नवोदित प्रस्तरारोहक व गिर्यारोहकांना तसेच शाळकरी मुले व तरुणांना या खेळासाठी प्रशिक्षण देखील मिळेल. व करिअर म्हणून देखील निवडता येऊ शकेल.

मागील दोन महिन्यात येथे मॅकमोहन द जंगल यार्डचे संस्थापक व सुधागड तालुक्याचे सुपूत्र मॅकमोहन हुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक धाडसी मोहीमा राबविल्या आहेत. त्यानंतर मुंबई पुणे आदी शहरांतील प्रस्तरारोहक व गिर्यारोहकांनी सरसगड व तैलबैलावर यशस्वी मोहीमा केल्या आहेत. माणगाव तालुक्यातील देवकुंड इथे देखील प्रस्तरारोहणासाठी डोंगर आहे. मॅकमोहन म्हणाले की गिर्यारोहण पर्वतावर चढण्याचे शास्त्र किंवा कला आहे. २०१९ मध्ये या खेळाला ऑलम्पिक मध्ये स्थान मिळाले आहे.

एक साहसी, कठीण व अत्यंत कार्यक्षमतेचा खेळ म्हणू शकतो. आज त्यास विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अखिल भारतीय क्रीडा मंडळाने त्यास एक क्रीडा प्रकार म्हणून रीतसर मान्यता दिली आहे. गिर्यारोहणात दहा ते पंधरा मीटर उंचीची टेकडी चढण्यापासून ते माउंट एव्हरेस्टसारखे उंच शिखर चढण्यापर्यंतचे सर्व प्रकार येतात. त्यासाठी विशेष प्रशिक्षणाची, कुशलतेची व योग्य त्या साधनसामग्रीची आवश्यकता असते. गिर्यारोहणाची प्रेरणा निसर्गावर विजय मिळविण्याची व जे अजिंक्य दिसते ते जिंकण्याची मानवाची नैसर्गिक इच्छा, त्याची साहसी वृत्ती, अज्ञात क्षेत्राचे संशोधन करण्याची त्याची जिज्ञासा या गिर्यारोहणाच्या प्रेरक शक्ती आहेत. गिर्यारोहणात घडणारे निसर्गाचे उदात्त दर्शन व व्यावहारिक रुक्ष जीवनातून होणारी सुटका यांमुळेही जिल्ह्यात अनेकांना गिर्यारोहणाचे आकर्षण वाटत आहे. जितके शिखर उंच व चढण्यास कठीण, तितके प्रयत्न अधिक व उत्साह दांडगा दिसून येतो. जिल्ह्यात अशा प्रकारे प्रस्तरारोहण व गिर्यारोहण मोठ्या प्रमाणात झाल्यास अनेक तरुण या खेळात विशेष प्राविण्य मिळवून जिल्ह्यासह देशाचे नावलौकीक करू शकतात. फंड व आर्थिक सहाय्य मिळाल्यास जिल्ह्यातील अनेक तरुणांना या क्षेत्रात आपले



करिअर करून पुढे जाता येईल. या खेळाचे प्रशिक्षण घेण्यासाठी स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ मौंटेनीरिंग, माउंट अबू येथे एडवेंचर कोर्स, बेसिक रॉक क्लायम्बिंग कोर्स, ऍडव्हान्स रॉक क्लाइंबिंग कोर्स, कॉचींग कोर्स, उपलब्ध आहेत. मॅकमोहन स्वतः येथे गेस्ट प्रशिक्षक म्हणून काम पाहतात.

> माणसाच्या विजिगीषू महत्त्वाकांक्षेला आव्हान देणारा एक क्रीडाप्रकार म्हणून गिर्यारोहण दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होत आहे. गिर्यारोहणाच्या खेळात स्वतःच्याच सामर्थ्यावर, सहनशीलतेवर व निर्णय बुद्धीवर अवलंबून राहावे लागते. निसर्गच गिर्यारोहकाला कार्यक्षेत्र देतो व प्रतिस्पर्धी म्हणून विरोधही करतो. उंच पर्वतक्षेत्रात शास्त्रीय संशोधन व अभ्यास करणे शक्य होते. जिल्ह्यात बहुतांश तरुण याकडे आकृष्ट होत आहेत.
>
> **मॅकमोहन हुले, संस्थापक, मॅकविला द जंगल यार्ड**

## भारतीय वृत्तपत्र दिनानिमित्त वृत्तपत्र विक्रेत्यांचा खालापूर प्रेस क्लबकडून सन्मान

**दै.रायगड नगरी । खोपोली**

२९ जानेवारी हा भारतीय वृत्तपत्र दिन म्हणून सर्वत्र साजरा होत असून या दिवसाला पत्रकार वृत्तपत्र विक्रेत्यांना महत्वाचा दिवस म्हणून मानला जातो. महाराष्ट्र बंद असो की कोरोना सारख्या महामरीत देशभरात घडणाऱ्या घटनांचा वृत्तपत्र विक्री करून वाचकांपर्यत पोहचविण्याचे कार्य करणाऱ्या स्टॉल धारकांचा खालापूर प्रेस क्लबने अनोखा उपक्रम घेत त्याच्या स्टॉल वर जाऊन शाल श्रीफळ देऊन सन्मान केला. यावेळी शुभेच्छा देत स्वताची काळजी घ्यावी व व्यवसायाच्या माध्यमातून देशात जनमानसात पेपरच्या माध्यमातून घडामोडी पोहचविण्याचे काम असेच अवितर चालू ठेवा अशा शुभेच्छा दिल्या या अनोख्या उपक्रमांनी भारावून गेले.



खोपोली शहरात हजारो वाचक नियमित पाहाटे पासून वृत्तपत्र विक्री करीत अनेकांच्या घरटी पेपर टाकन्याचे काम करीत असल्याने प्रत्येक ठिकाणच्या घटना वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचकांपर्यत पोहचविण्याचे काम खोपोली शहरात दिलीप पवार, ध्रुव मेहंदळे, एकनाथ तोंडे, शिळफाटा येथे बाबू, व मिलिंद वारंगे खालापुरात हेमाताई चिंबुलकर हे वृत्तपत्र विक्रेते अविरत पणे पहाटे पासून वृत्तपत्राची विक्री करून देशभरात घडणाऱ्या घटना जनमानसात व वाचकांपर्यत पोहचविण्याचे काम करीत असल्याने त्याचा भारतीय वृत्तपत्र दिनाचे औचित्य साधून खालापूर प्रेस क्लबच्या माध्यमातून या पाच विक्रेत्यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावेळी जेष्ट सल्लागार भाई ओव्हाळ, अध्यक्ष प्रशांत गोपाळे, प्रवीण जाधव, रवी मोरे, नवज्योत पिंगळे, राज साळुंके, जयवंत माडपे, सामजिक कार्यकर्ते राजन फक्के, करडे यासह अन्य वाचक मान्यवर उपस्थित होते.

## कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली सफाई कामगारांचे पगार तब्बल त्रेचाळीस हजार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा MIDC मधील मे. केलॉग्स इंडिया ली. या कंपनीतील सफाई व गार्डनिंग करणाऱ्या कामगारांना कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या न्यू मॅरीटाईम अॅन्ड जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून तीन वर्षासाठी ९,०००/- रुपयांची पगारवाढ देण्याचा करार आज संघटनेच्या पनवेल येथील कार्यालयात करण्यात आला. पगारवाढीमुळे सफाई कामगारांचा पगार तब्बल ४३,०००/- रुपये झाला आहे. या करारनाम्यानुसार १३% बोनस २ लाख रुपयांची मेडीक्लेम पॉलीसी तसेच टर्म इनश्युरन्ससाठी ४,०००/- प्रत्येक वर्षी, २ रजेमध्ये वाढ करण्यात आली आहे. पिकनिकसाठी दरवर्षी ४०,०००/- रुपये, महिन्यातून २ वेळा हाफडे जाण्याची मुभा देण्याचे मान्य करण्यात आले आहे. कोरोना काळातही तब्बल ९,०००/- रुपये पगारवाढ झाल्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कामगारांनी संघटनेचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

या करारनाम्याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष तथा रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत, कार्याध्यक्ष पि. के. रामण, सरचिटणीस वैभव पाटील, व्यवस्थापनातर्फे शंकर सुब्रमनियन, प्रमोद वाडकर, एस. के. एंटरप्रायजेसचे डायरेक्टर सुरेश खानावकर, संकेत खानावकर, संघटक श्री. योगेश रसाळ, आदित्य घरत, विवेक म्हात्रे, केसरीनाथ नाईक, कामगारांतर्फे भगवान ढोंगरे, मारुती पाटील, प्रकाश फडके, मोहन फडके, दिलीप पोरजी आदी उपस्थित होते.

